



RNI NO-MAHMAR/2022/90217

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

संपादक : जितेंद्र कायस्थ
Email- jansanchlan@gmail.com
Mob- 9822720784






वर्ष ३ रे अंक : १८३ वा गुरूवार दि ०४ सप्टेंबर २०२५ पृष्ठ ८ किंमत ३ रुपये

# ५० बेकायदेशीर फेरफार,कोट्यवधींचा गैरव्यवहार तरीही टेकाळे अजून सेवेत!

**जनसंचलन/बुलढाणा**

महसूल विभागातील मंडळ अधिकारी विजय दत्तात्रय टेकाळे यांच्या भ्रष्टाचाराचा महाभयंकर कर्दनकाळ उघड झाला असूनही, दोन वर्षांपासून कारवाईच्या नावाखाली केवळ ढिम्मपणा सुरू आहे. सातगाव म्हसला येथे कार्यरत असताना टेकाळे यांनी तुकडेबंदी कायद्याचे उल्लंघन करत तब्बल ५० अनोंदणीकृत फेरफार मंजूर केले. या बेकायदेशीर कृत्यामुळे शासनाला मोठ्या प्रमाणात महसूल बुडाला, पण तरीही जिल्हाधिकारी व संबंधित यंत्रणा मौन बाळगत आहेत. तक्रारदार यांनी केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे,आयुक्त अमरावती, एसीबी तसेच जिल्हाधिकाऱ्यांपर्यंत ठोस पुरावे सादर केले. तरीही टेकाळे यांच्यावर चौकशीचा ठिणगाही उडालेला नाही. एवढेच नव्हे तर जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी साधी चौकशीसुद्धा केली नाही, हा अधिक लाजिरवाणा प्रकार आहे. भ्रष्टाचाराच्या पुराव्यांची ढीग असूनही, महसूल विभागातील काही चलाख अधिकाऱ्यांच्या पाठिशी असलेल्या या मंडळ अधिकाऱ्याला संरक्षण मिळत असल्याचा संशय अधिक गडद झाला आहे. गलेलठ्ठ सरकारी पगार घेऊन शासनाचा महसूल लाटणाऱ्या या अधिकाऱ्याने नियमबाह्य कामे करून स्वतःच्या व कुटुंबातील सदस्यांच्या नावावर कोट्यवधींची चल-अचल मालमत्ता उभी केली आहे. तरीही एसीबी आणि महसूल विभाग कारवाई ऐवजी पत्रव्यवहाराच्या खेळात वेळ घालवत आहेत. परिणामी, नागरिकांचा शासन व प्रशासनावरील विश्वास डळमळीत होत आहे. तक्रारकर्त्यांनी महसूल मंत्र्यांना सादर केलेल्या निवेदनात टेकाळे यांना तातडीने सेवेतून बडतर्फ करण्याची मागणी केली आहे. अन्यथा हा भ्रष्टाचार दाबण्याचा कट आहे, असा सवाल नागरिकांतून जोरदार उपस्थित केला जात आहे. मंडळ अधिकारी महाभ्रष्टाचारी विजय दत्तात्रय टेकाळे यांची विभागीय चौकशी सुरू असताना त्यांनी सर्व नियम धाब्यावर बसून शहरातील मध्यभागी असलेल्या गट क्रमांकतून जवळपास शेकडो प्लॉट दुसऱ्याच्या नावे करूनही संबंधित प्रशासनाने या महाठगाची कोणतीही चौकशी न करता ते प्रकरण दाबून धरले या संपूर्ण भ्रष्टाचार प्रकरणाची सर्व पुरावे महसूल मंत्री बावनकुळे, आयुक्त अमरावती, एसीबी मुंबई, एसीबी अमरावती, एसीबी बुलढाणा, जिल्हाधिकारी, एसडीओ,व तहसीलदार (गोलमाल गोलमाल) यांना देऊन ही आज पावतो मंडळाधिकारी विजय दत्तात्रय टेकाळे यांच्यावर कारवाई का करण्यात आलेली नाही याची सर्वत्र चर्चा जोर धरत आहे.




# प्रभाग रचनेवर अनेकांचा आक्षेप!

## जिल्ह्यातील सर्व नगरपालिका सीओ समवेत हरकतीवर जिल्हाधिकाऱ्यांची चर्चा !

## जिल्ह्यातील १३ ही नगर पालिकेतील प्रभाग रचनेवर प्रश्नचिन्ह?

**जनसंचलन/बुलढाणा**

स्थानिक स्वराज्य संस्थेची निवडणूक प्रक्रिया सुरू झाली आहे. दरम्यान प्रभाग रचनेवर अनेकांनी आक्षेप नोंदविला असून, जिल्हाधिकारी यांनी काल नगर पालिकांच्या मुख्याधिकाऱ्यां सोबत चर्चा केली.दरम्यान नगर रचना नियमबाह्य असल्याचा आरोप करीत हरकतीदारांनी योग्य प्रभाग रचना न झाल्यास न्यायालयात दाद मागण्याचा इशारा यावेळी दिला आहे. जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्य निवडणुकांच्या पार्श्वभूमीवरील प्राथमिक प्रक्रिया सुरु झाली असून, प्रथम शहरातील प्रभाग रचना तयार करण्यात आली. जिल्ह्यातील नगर पालिकेची प्रभाग रचना प्रसिद्ध झाल्या नंतर हरकती घेण्याचे आवाहन करण्यात आले होते. त्यानुसार प्रत्येक शहरात असंख्य हरकती जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी यांच्याकडे घेण्यात आल्या आहेत. त्यावर काल जिल्हाधिकारी यांनी १३ ही नगर पालिकेच्या मुख्याधिकारी सोबत चर्चा केली. तसेच हरकतीदारांना सुद्धा बोलाविण्यात आले होते. हरकती समजून घेण्यात आल्या व त्यानुसार प्रभाग रचनेत बदल करण्यात येईल, असे आश्वासित करण्यात आले.




ज्या हरकतीचा विचार केला जाणार नाही त्या विरोधात न्यायालयात दाद मागणार असल्याचा इशारा हरकतीदारांनी यावेळी दिला आहे.

### काय आहे आक्षेप?

बुलढाणा नगर प्रशासनाने नागरिकांच्या सोयीची प्रभाग रचना न करता राजकीय व्यक्तींच्या सोयीची प्रभाग रचना केलेली आहे. नगरपरिषदेने नॅशनल हायवे,नदी, नाले, तलाव, शाळा, कब्रस्तान, स्मशानभूमी याबाबतच्या मार्गदर्शक तत्वांचा विचार केला गेलेला नाही. नगरपरिषदेने प्रसिद्ध केलेल्या प्रभाग रचनेच्या नकाशामध्ये प्रगणक हे दर्शविलेले नाही, कोणता प्रगणक कुठे टाकला आहे? याबाबत स्पष्टोक्ती केलेली नाही, प्रगणक यामध्ये कुठेही सलग्नता ठेवण्यात आलेली नाही. यामुळे नागरिकांची खऱ्या अर्थाने दिशाभूल करण्याचे काम बुलढाणा नगर प्रशासनाने केलेले आहे. दलित वस्ती, आदिवासी वस्ती यांचे विभाजन व्हायला नको असताना सदर प्रभार रचनेत त्यांचे विभाजन करण्यात आलेले आहे. शासनाच्या मार्गदर्शक तत्त्वांची पायमल्ली करत हेतू पुरस्कर, विशिष्ट राजकीय व्यक्तींना फायदा व्हावा म्हणून सदोष प्रभाग रचना केलेली आहे. दरम्यान या व इतर अनेक मुद्द्यांवर प्रभागानुसार आक्षेप व खुलासा करून ही प्रभाग रचना सदोष असल्याचे निर्दशनास आणून दिले व याबाबत जिल्हाधिकारी यांच्याशी सविस्तर चर्चा केली. प्रभाग रचनेत असलेले दोष तात्काळ दुरुस्त करून शासनाच्या मार्गदर्शक तत्वांचे पालन करणारी, पारदर्शक व नागरिकांच्या सोयीची प्रभाग रचना तयार करावी, अशी विनंती या यावेळीकरण्यात आली. याबाबत सकारात्मक व उचित निर्णय घेऊ अशी ग्वाही जिल्हाधिकारी यांनी या प्रसंगी दिली आहे.

दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# गुणवान अभिनेत्री प्रिया मराठे...

## संपादकीय लेख

अभिनयाची कारकीर्द बहरून येत असताना प्रिया मराठेसारख्या गुणी अभिनेत्रीचे, अवघ्या ३८व्या वर्षी हे जग सोडून जाणे वेदनादायी आहे. वाट्याला आलेल्या प्रत्येक भूमिकेचे सोने करणाऱ्या कलाकारांत प्रियाचा समावेश करावा लागेल. ठाण्यात २३ एप्रिल १९८७ रोजी प्रियाचा जन्म झाला. ठाण्यातील ए. के. जोशी हायस्कूलमधून शालेय शिक्षण, तर बी. एन. बांदोडकर महाविद्यालयातून तिने विज्ञान शाखेतून पदवी घेतली. वेलिंगकर इन्स्टिट्यूटमधून व्यवस्थापनाचे धडेही तिने गिरवले. महाविद्यालयातील एकांकिका स्पर्धांमधून आपल्या अभिनयाची चुणूक दाखवणाऱ्या प्रियाने नंतर रंगमंच, छोटा पडदा या माध्यमांतील कामाने स्वत:ची दखल सगळ्यांनाच घ्यायला लावली. ङ्ग्या सुखांनो याफ या मालिकेत दिग्गज कलाकार असताना त्यातही स्वत:चा ठसा तिने उमटवला. त्या मालिकेत तिने वठवलेली ङ्गपावनीफ ही व्यक्तिरेखा आजही प्रेक्षकांच्या स्मरणात आहे. त्यानंतर हिंदी मालिकाविश्वातही तिने जम बसवला. ङ्गकसम सेफ, ङ्गपवित्र रिश्ताफ, ङ्गउतरनफ,ङ्गबडे अच्छे लगते हैफ या एकापेक्षा एक बड्या मालिकांचा ती भाग बनली. जीवनाकडे कायम सकारात्मकतेने बघणारी, मेहनत घेणारी, कामाशी एकनिष्ठ असलेली प्रिया प्रेक्षकांसह सहकलाकार असलेल्या मोठ्या मित्रपरिवारातही प्रिय होती. चेहरा गोड असला, तरी अभिनयाचे नाणे इतके खणखणीत होते, की ङ्गतू तिथे मीफ, तुझेच मी गीत गात आहेफ आणि ङ्गतू भेटशी नव्यानेफ या मालिकांमध्ये तिने साकारलेल्या खलनायिकाही तितक्याच गाजल्या. रंगमंचावरील सहज वावर, टायमिंग आणि संवादफेक यामुळे तिचा अभिनयप्रवास अधिक खुलला. ङ्गकोण म्हणतं टक्का दिलाफ, अ परफेक्ट मर्डर, तिला काही सांगायचंय अशा वेगळ्या विषयांवरील नाटकांची निवड करत तिने तिची वैचारिक बैठक किती पक्की आहे, हे दाखवून दिले. मोठ्या पडद्यावरची तिची कारकीर्द पुरेशी खुलायच्या आतच ती कायमची निघून गेली. तिला विनम्र श्रद्धांजली.






# अंमली पदार्थ माफियावर कारवाईचा बडगा!

## हैदर खान अन्वर खान एका वर्षासाठी स्थानबद्ध!

**जनसंचलन/बुलढाणा**

सण- उत्सवात कायदा व सुव्यवस्था अबाधीत राखण्यासाठी जिल्हा पोलीस अधीक्षक निलेश तांबे कारवाईचा बडगा उगारत आहेत. त्यांच्या व जिल्हाधिकारी किरण पाटील यांच्या आदेशाने अंमली पदार्थ माफिया हैदर खान अन्वर खान रा. हरी फैल, खामगाव याच्यावर एमपीडीए कायद्याखाली कारवाई करण्यात येऊन त्याला एक वर्षासाठी स्थानबद्ध करण्यात आले आहे. जिल्ह्याच्या अभिलेखावर गांजा तस्कर,मालमत्ता व शरीराविरुद्ध अवैध दारू आणि इतर तत्सम गुन्हे दाखल असलेल्या गुन्हेगारावर महाराष्ट्र झोपडपट्टी दादा, औषधी द्रव्य विषयक गुन्हेगार, हातभट्टीवाले तसेच धोकादायक व्यक्ती यांच्या विघातक कृत्याला आळा घालण्याबाबत १९८१ अधिनियमा प्रमाणे प्रभावी प्रतिबंधात्मक कारवाई करून प्राधिकरणांशी सुयोग्य समन्वय ठेवून पाठपुरावा करण्यासाठी जिल्हा पोलीस अधीक्षक निलेश तांबे यांनी आदेशित केले होते.या पार्श्वभूमीवर एलसीबीने एमपीडीए प्रमाणे प्रस्ताव तयार करून जिल्हाधिकारी यांच्याकडे सादर केला होता.या अनुषंगाने ३ सप्टेंबर रोजी एमपीडीए कायद्याप्रमाणे अंमली पदार्थ माफिया हैदर खान अन्वर खान रा. हरी फैल, खामगाव याला एक वर्षासाठी स्थानबद्ध करण्याचे आदेश जिल्हाधिकारी यांनी पारित केले आहे.या गुन्हेगाराला पोलिसांनी ताब्यात घेतले असून तीन आठवड्यासाठी बुलढाणा मध्यवर्ती कारागृहात ठेवण्यात आले असून त्यानंतर त्याला पुणे येथील येरवडा कारागृहात स्थलांतरित करण्यात येणार आहे.विशेष म्हणजे जिल्हा पोलीस दल २६ जून पासून अंमली पदार्थ विरुद्ध मिशन परिवर्तन राबवीत असून, अंमली पदार्थांची वाहतूक, साठवणूक व विक्री करणाऱ्या समाजकंटक इसमावर कायदेशीर व कठोर, प्रतिबंधात्मक कारवाई करीत आहे.

*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# बायकोचा नकार जिव्हारी, नवऱ्याने मुलासमोरच जीव घेतला...

**सिन्नर:** दारू पिण्यासाठी पैसे न दिल्याच्या रागातून मद्यपी नवऱ्याने पत्नीची हत्या केल्याची घटना तालुक्यातील निमगाव येथे घडली. नंदा किरण सानप (वय ३४) असे मृत महिलेचे नाव असून, पती किरण विष्णू सानप (वय ३८) याला नाशिकमधून अटक करण्यात आली. निमगाव सिन्नरच्या टेकाडे वस्ती शिवारात राहणारे दाम्पत्य किरण आणि पत्नी नंदा यांच्यात नेहमीच खटके उडत होते. मंगळवारी (दि. २) सकाळी ११ वाजेच्या सुमारास किरण याने पत्नीकडे दारू पिण्यासाठी पैसे मागितले. मात्र, तिने ते देण्यास नकार दिल्याने दोघांमध्ये कडाक्याचे भांडण झाले. राग अनावर झाल्याने त्याने पत्नीच्या डोक्यात हातोडीने वार केले. त्यानंतर तो तिथून गावात आला. संध्याकाळी ५ वाजेपर्यंत तो घरी न आल्याने त्याची आई आणि मुलाने गावात शोध घेतला. दोघांना पाहताच त्याने आपल्या टेकाडे मळ्यातील वस्तीवर धूम ठोकली.छोटा मुलगा सार्थक घटनास्थळी आल्यानंतर त्याने आजूबाजूच्या नातेवाइकांना घटनेची माहिती दिल्यानंतर त्यांनी तातडीने जखमी अवस्थेतील नंदाला उपचारांसाठी प्रारंभी सिन्नरला आणि त्यानंतर नाशिक येथील एका खासगी रुग्णालयात दाखल केले. रात्री ११.४५ वाजेच्या सुमारास उपचारांदरम्यान नंदाची प्राणज्योत मालवली. दरम्यान, नाशिक येथील मुंबई नाका पोलिस स्टेशनच्या माहितीनंतर मुसळगाव एमआयडीसी पोलिस ठाण्याचे



निरीक्षक भरत जाधव यांच्यासह एका टीमने निमगाव-सिन्नरला, तर दुसऱ्या टीमने नाशिक येथे खासगी रुग्णालयात जाऊन घटनेची माहिती घेत पंचनामा केला.दरम्यान, शवविच्छेदनानंतर मयत महिलेचा मृतदेह नातेवाइकांच्या ताब्यात देण्यात आला. महिलेचे वडील बबन गोपाळा साबळे (६६, रा. दापूर, ता. सिन्नर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून किरण सानप याच्या विरोधात खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अधिक तपास पोलिस उपनिरीक्षक राजू पाटील करत आहे.


## जगभ्रमंतीवर निघालेल्या मराठमोळ्या ब्लॉगरला फटका, नवी मुंबईकर योगेश आलेकरींची बाईक यूकेमध्ये चोरीला, पैसे-पासपोर्ट गमावले

**नवी मुंबई :** नवी मुंबईतील ३३ वर्षीय ब्लॉगर योगेश आलेकरी जगभ्रमंतीसाठी निघाले आहेत. मात्र यूकेमधील नॉटिंगहॅम येथील एका पार्कमधून त्यांची बाईक चोरीला गेली. बाईकमध्ये त्यांचा पासपोर्ट आणि इतर महत्त्वाचे सामान होते. यूके पोलीस गुन्हेगारी रोखण्यात अपयशी ठरल्याचा आरोप आलेकरांनी केला आहे. २४ हजार किलोमीटरचा प्रवास करत १७ देश पालथे घातल्यानंतर बाईकचोरीचा प्रकार घडला.योगेश आलेकरी हे मूळचे महाराष्ट्रातील नवी मुंबईचे आहेत. ते एकटेच बाईकवरुन जगभ्रमंतीसाठी निघाले आहेत. मे महिन्याच्या सुरुवातीला भारतातून त्यांनी या प्रवासाला सुरुवात केली होती. मात्र त्यांची बाईक ब्रिटनमधील नॉटिंगहॅम शहरात चोरीला गेली. त्यामुळे त्यांनी तेथील पोलिसांवर जोरदार टीका केली आहे. पोलिसांनी गुन्हेगारी रोखण्यासाठी काहीच केले नाही, असा त्यांचा आरोप आहे.इङ्ख्या प्रवासात माझी बाईकच माझे सर्वस्व होते. ती माझं स्वप्न आहे, माझी आवड आहे, माझा आत्मा आहे. ते माझं घर होतं, पण आता हे घरच चोरीला गेलं आहे,इङ्ख असं योगेश भावनिक होत म्हणाले.योगेश आलेकरी हे मूळचे महाराष्ट्रातील नवी मुंबईचे आहेत. ते एकटेच बाईकवरुन जगभ्रमंतीसाठी निघाले आहेत. मे महिन्याच्या सुरुवातीला भारतातून त्यांनी या प्रवासाला सुरुवात केली होती. मात्र त्यांची बाईक ब्रिटनमधील नॉटिंगहॅम शहरात चोरीला गेली. त्यामुळे त्यांनी तेथील पोलिसांवर जोरदार टीका केली आहे. पोलिसांनी गुन्हेगारी रोखण्यासाठी काहीच केले नाही, असा त्यांचा




आरोप आहे.इङ्ख्या प्रवासात माझी बाईकच माझे सर्वस्व होते. ती माझं स्वप्न आहे, माझी आवड आहे, माझा आत्मा आहे. ते माझं घर होतं, पण आता हे घरच चोरीला गेलं आहे,इङ्ख असं योगेश भावनिक होत म्हणालेमाझ्या बाईकवर खूप सामान होते. मी माझे सर्वस्व गमावले आहे. माझ्याकडे फक्त जॅकेट, बूट आणि हेल्मेट राहिले आहे. मी टुरिस्ट व्हिसावर आलो आहे आणि या देशात पर्यटकांसाठी कोणतीही सुरक्षा नाही. जर ही घटना भारतात एखाद्या परदेशी व्यक्तीसोबत घडली असती, तर संपूर्ण पोलीस दल आणि भारत सरकारने चोरांना पकडण्यासाठी कोणतीही कसर ठेवली नसती. मी माझ्या आयुष्यातील सर्वात वाईट परिस्थितीतून जात आहे.इङ्ख असंही योगेश म्हणाले. नॉटिंगहमशायर पोलिसांचे सार्जंट डॅनियल शेस्बी म्हणाले, इङ्खआमचे पोलीस पथक गेल्या गुरुवारपासून तपास करत आहे. पण दुर्दैवाने आम्हाला अजूनही बाईक सापडलेली नाही. बाईक मालकाला किती त्रास झाला असेल, हे आम्ही समजू शकतो. पण पोलिसांनी हे प्रकरण गांभीर्याने घेतले आहे, याची आम्ही त्यांना खात्री देतो.

## नवसाला पावणाऱ्या बाप्पाचं दर्शन घेऊन निघाले, वाटेत अनर्थ घडला, तीन भाविकाचा दुर्दैवी अंत




**नांदेड:** जिल्ह्यातील भोकर तालुक्यात श्रीक्षेत्र पाळज येथील प्रसिद्ध आणि नवसाला पावणाऱ्या गणरायाचे दर्शन घेऊन परत गावी जाणाऱ्या भाविकांवर काळाने घाला घातला. रोड उभ्या असलेल्या ट्रकला जोरदार धडक दिल्याने कार मधील तिघांचा मृत्यू झाला. बुधवारी रात्री भोकर- म्हैसा रोड वरील नांदा शिवारा जवळ ही दुर्दैवी घटना घडली. अपघात एवढा भीषण होता की कारचा चुराडा झाला होता. फुली राजू चकनुरी, सुनीता चकनुरी आणि वाणी अशी मयतांची नावे असून सर्व जण तेलंगणा राज्यातील रहिवासी आहेत. या घटनेने हळहळ व्यक्त होतं आहे. सद्या गणशोत्सव सुरु आहे. नांदेड जिल्ह्यातील भोकर तालुक्यातील पाळजचा गणपती प्रसिद्ध आहे. लाकडापासून तयार केलेल्या गणपतीची स्थापना दरवर्षी केली जाते. राज्यात पाळजचा गणपती प्रसिद्ध आणि नवसाला पावणारा अशी ओळख आहे. गणेशोत्सवाच्या काळात महाराष्ट्र, आंध्रप्रदेश आणि तेलंगणा या तीन राज्यातील लाखो भाविक दर्शनासाठी पाळज येथे येतं असतात. भाविकांची मोठी रिघ असते.तेलंगणा राज्यातील पाच जण मंगळवारी कारने गणपती बाप्पाच्या दर्शनासाठी आले होते. मंगळवारी रात्री नऊ वाजेच्या सुमारास दर्शन करून परत आपल्या गावी जातं होते. भोकर - म्हैसा रोडवरील नांदा शिवारात येताच भरधाव वेगात असलेल्या कारने रोडवर उभ्या असलेल्या ट्रकला धडक दिली. अपघात एवढा भीषण होता की कारमधील फुली राजू चकनुरी, सुनीता चकनुरी आणि वाणी यांचा जागीच मृत्यू झाला तर इतर दोघे जण गंभीर जखमी झाले. मयत हे निझामाबाद जिल्ह्यातील रहिवासी असल्याची माहिती आहे. घटनेची माहिती मिळताच पोलिस उपअधीक्षक एस. हाके, पोलीस निरीक्षक अजित कुंभार, सहायक पोलीस निरीक्षक शैलेंद्र औटे घटनास्थळी दाखल झाले होते. या घटनेने हळहळ व्यक्त होतं आहे.

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# बोलबाला कृत्रिम बुद्धिमत्तेचा



कृत्रिम बुद्धिमत्ता ही संगणकशास्त्रातली एक महत्त्वाची शाखा आहे. या शाखेमध्ये यंत्र शिक्षण, त्यांची बुद्धिमान आणि परिस्थितीला जुळवून घेण्याची क्षमता आदींचा अभ्यास केला जातो. या शाखेतलं संशोधन मुख्यत: स्वयंचलित कार्य करण्यासाठी आवश्यक असणारी बुद्धिमान वर्तणूक करू शकेल, अशा यंत्रांशी निगडित आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता म्हणजे काय, याबद्दलची ही रंजक माहिती.

बुद्धी ही अशी बाब आहे, जिच्या बळावर आणि निसर्गदत्त क्षमतेच्या आधारे प्रत्येक सजीव अधिकाधिक चांगलं जगण्याचा प्रयत्न करत असतो. त्यातही बुद्धीचं वाटप करताना देवाने माणसाला झुकतं माप दिलं आहे. त्यामुळेच बुद्धीच्या निकषांवर सर्व सजीवांच्या तुलनेत मिळालेल्या या सर्वोच्च वरदानाचा लाभ उठवत आपण आपल्यापेक्षा अधिक शक्तिमान, बलवान, अवाढव्य प्राण्यांबरोबरच आकाश आणि अवकाशावरही सत्ता प्रस्थापित केली आहे. दगडाची अवजारं बनवण्यापासून सुरू झालेला माणसाचा प्रवास अवकाशात अंतराळस्थानक स्थापित करण्यापर्यंत पोहोचला तो याच बुद्धीच्या बळावर. बुद्धीच्या बळावर यंत्राला तंत्रज्ञान मिळालं आणि आता या तंत्रज्ञानाच्या विकासाचा वेगही कमालीचा वाढत आहे. आता बोलबाला आहे कृत्रिम बुद्धिमत्तेचा. मानव यंत्रांमध्ये, उपकरणांमध्ये अशा बुद्धिमत्तेची पेरणी करण्याच्या कामात व्यग्र आहे ज्यामुळे यंत्रं मानवी आज्ञेबरोबरच आकलन, निरीक्षण, परीक्षण, तौलनिक अभ्यास करून स्वत:चे निर्णय स्वत: घेतील आणि माणसाच्या हस्तक्षेपाविना संबंधित काम समारोपापर्यंत पोहोचेल. या अलीकडेच अंकुरलेल्या संकल्पनेचा आविष्कार सध्या आपण काही प्रमाणात अनुभवत आहोत. मात्र, याला मिळणारी यशस्विता पाहता, नजीकच्या भविष्यात बरीचशी यंत्रं कृत्रिम बुद्धिमत्तेच्या बळावर काम करू शकतील, अशी आशा बाळगण्यास हरकत नाही.


कृत्रिम बुद्धिमत्तेच्या आधारे चालणा-या या यंत्रांना आपण हुशार मशिन्स असं म्हणू शकतो. एखाद्या मशीनने माणसाची ओळख पटवली, माणसाबरोबर बुद्धिबळाचा खेळ खेळला, तर त्या मशीनला कृत्रिम बुद्धिमत्तायुक्त मशीन म्हणून ओळखलं जातं. ही संकल्पना पुढे मानवरहित गाडी अथवा मानवरहित विमानचालनापर्यंत विस्तारू शकते. जॉन मॅकार्थी हे कृत्रिम बुद्धिमत्ता या संकल्पनेचे संस्थापक. त्यांनी मार्वनि मिन्स्की, हर्बर्ट साइमन आणि एलेन नेवेल या सहका-यांसवे कृत्रिम बुद्धिमत्ता या संकल्पनेशी संबंधित संशोधन आणि संस्थापन केलं. १९५५ मध्ये जॉन मॅकार्थी यांनीच सर्वप्रथम कृत्रिम बुद्धिमत्ता या शब्दाचा प्रयोग केला. आता हा शब्द आपल्या चांगल्याच परिचयाचा झाला आहे. आजचं युग पूर्णपणे डिजिटल झालंय. माहिती (डेटा), कृत्रिम बुद्धिमत्ता (आर्टिफिशिअल इंटेलिजन्स) आणि कनेक्टिव्हिटी या तीन घटकांचा समावेश असलेली चौथी औद्योगिक क्रांती आता जगात घट्ट लागली आहे. आता जागतिक अर्थव्यवस्थेत माहितीने तेलाची जागा घेतली आहे. प्रत्येक वस्तू, उपकरण स्मार्ट असणं ही आज चैन नसून गरज बनत आहे. आगामी शतकात यंत्रमानव आणि मानव यांमधली दरी कमी कमी होणार आहे. ऑटोमेशन आणि कृत्रिम बुद्धिमत्ता ही सगळ्यात वेगानं वाढणारी क्षेत्रं बनत आहेत. कृत्रिम बुद्धिमत्ता, मशीन लर्निंग, बिग डेटा ॲनालिसिस, रोबोटिक्स या आणि यासारख्या घटकांमुळे संबंधित संगणकीय प्रणाली आणि यंत्रणा अधिकाधिक ऑटोनॉमस म्हणजे स्वतंत्रपणे निर्णय घेणा-या आणि स्वयंभू बनत आहेत यात शंकाच नाही. नजीकच्या काळात कृत्रिम बुद्धिमत्ता क्षेत्रातली ही झेप अनेक क्षेत्रांवर प्रभाव दाखवायला सुरुवात करेल. या तंत्रज्ञानामुळे अनेक क्षेत्रं आमूलाग्र बदलतील.

कृत्रिम बुद्धिमत्ता ही संगणक शास्त्रातील एक महत्त्वाची शाखा आहे. या शाखेमध्ये यंत्रशिक्षण, त्यांचं बुद्धिमान आणि परिस्थितीला जुळवून घेण्याची क्षमता आदींचा अभ्यास केला जातो. या शाखेतलं संशोधन मुख्यत: स्वयंचलित कार्य करण्यासाठी आवश्यक असणारी बुद्धिमान वर्तणूक करू शकतील, अशा यंत्रांशी निगडित आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता म्हणजे काय, या प्रश्नाचं उत्तर तांत्रिक भाषेत जाणून घेण्यासाठी, सोप्या भाषेत सांगण्यासाठी एक उदाहरण पाहू या. आपण एखाद्या लहान मुलाला पहिल्यांदा खायला शिकवतो तेव्हा कसं खायचं, खाण्यास काय योग्य आणि काय नाही हे देखील शिकवत असतो. बरेच दिवस शिकवल्यानंतर काही काळाने कोणती गोष्ट खायची आणि ती कशी खायची, हे त्या मुलाला पुन:पुन्हा शिकवावं लागत नाही. तो हे सगळे निर्णय आपले आपण घेऊ शकतो. यालाच आपण मानवी बुद्धिमत्ता असं म्हणतो. नेमकी हीच गोष्ट यंत्राबाबत घडते, तेव्हा त्याला त्या यंत्राची कृत्रिम बुद्धिमत्ता असं म्हणतात.

प्रत्येक वेळी अनुभवातून सिद्ध होत जाणारं यंत्र बनवण्यासाठी लिहिल्या जाणा-या विशेष प्रोग्रामला न्युरल नेटवर्क प्रोग्राम असं म्हणतात. अशा प्रकारचे प्रोग्राम लिहिण्यासाठी विशेष प्रकारचं लॉजिक वापरलं जातं. त्यातला एक प्रकार म्हणजे, फझी लॉजिक. हेच लॉजिक छोटय़ा स्वरूपात सध्याच्या अनेक ऑटोमॅटिक वॉशिंग मशिन्समध्ये वापरलं जातं; ज्यामध्ये कपडय़ांचं वजन पाहून पाण्याची पातळी, त्याचं तापमान, रोटरचा वेग, लागणारा वेळ या सा-या गोष्टी मशीन स्वत:च ठरवतं. एकदा आपण कपडे टाकले की, मशीन स्वत: आपले निर्णय घेतं. ही कृत्रिम बुद्धिमत्तेची सुरुवात म्हणता येईल. याच्या पुढचं उदाहरण म्हणजे सध्याच्या स्मार्ट होममधील स्मार्ट कूलिंग सिस्टीम म्हणजेच एसी. हा विशेष प्रोग्राम्ड एसी स्वत:चे सेन्सर्स वापरून तापमान, हवेतली आर्द्रता, वा-याची दिशा आदी माहिती मिळवतो आणि त्यानुसार कधी, किती वेळ चालू राहायचं, आपला कूलिंग स्पीड काय असायला हवा हे ठरवतो. नवीन एसी तर याहीपेक्षा एक पायरी पुढे आहेत. ते घरात उपस्थित असणा-या माणसांची संख्या, त्यांच्या थर्मल इमेजेस पाहून आपल्या कार्यक्षमतेत बदल करतो. शिवाय घरातल्या व्यक्ती साधारणपणे रोज कोणत्या विशिष्ट वेळी घरी येतात, याचा योग्य ट्रक ठेवून रोज त्याचवेळी आपला आपण सुरू होतो. म्हणजेच घरी येईपर्यंत घर थंड झालेलं असतं. मशीन लर्निंग, नॅचरल लँग्वेज प्रोसेसिंग ऊर्फ एनएलपी आणि कॉग्निटिव्ह कॉम्प्युटिंग या तीन अतिशय प्रगत तंत्रज्ञानांवर कृत्रिम बुद्धिमत्तेचा डोलारा उभा आहे. या तंत्रज्ञानाचा वापर करून संगणकीय प्रणालीला माणसाप्रमाणे विचार करण्याची क्षमता प्राप्त व्हावी, हा यामागील उद्देश आहे.

एआयफमुळे रोजगार निर्मितीच्या प्रक्रियेला वेग डिजिटल क्रांतीच्या या काळात एआय अर्थात कृत्रिम बुद्धिमत्ता हे एक प्रभावी माध्यम म्हणून समोर आल्याने रोजगारनिर्मितीच्या प्रक्रियेला वेग आला. २०२५ पर्यंत मानवी आयुष्याशी संबंधित प्रत्येक गोष्टीत एआयचा सहभाग असेल, असं प्यू रिसर्च सेंटरने केलेला अभ्यास सांगतो. पुढच्या तीन वर्षांमध्ये एआयफमुळे पाच लाख नवे रोजगार उपलब्ध होणार असल्याचं एका संशोधनातून समोर आलं आहे. या नव्या तंत्रज्ञानामुळे रोजगार कमी होण्याची शंकाही अशा असंख्य अहवालांमुळे दूर झाली आहे. त्यामुळे एआयच्या क्षेत्रात करिअरची मुहूर्तमेढ रोवण्याची हीच योग्य वेळ असल्याचं तज्ज्ञांना वाटतं. जगभरातल्या कंपन्याही एआयफ तंत्रज्ञान लागू करण्याच्या प्रयत्नात आहेत. यामुळे तज्ज्ञ आणि कुशल तंत्रज्ञांच्या मागणीत वाढ झाली आहेच शिवाय या क्षेत्रात स्पर्धाही निर्माण झाली आहे. अशा परिस्थितीत करिअरच्या दृष्टिकोनातून एआयफकडे पाहणा-या तरुणांना योग्य कौशल्यं विकसित करावी लागणार आहेत. इतकंच नाही, तर सातत्याने होणा-या तंत्रज्ञानातल्या बदलांशी जुळवून घेण्याची क्षमता विकसित करावी लागणार आहे.

# दोन कप कॉफीसाठी ३.७० लाख रुपये



अनेकदा कॉफी पिणारे लोक एखाद्या विशिष्ट रेस्तराँ किंवा हॉटेलमध्ये जाऊनच कॉफी पिण्याचा आनंद घेतात. मग यासाठी कितीही खर्च झाला तरी कॉफीप्रेमींना फारसा फरक पडत नाही. असाच काहीसा प्रकार एका जोडप्याबरोबर झाला. जगप्रसिद्ध स्टारबक्स या कॉफी रेस्तराँमध्ये या जोडप्याने दोन कप कॉफीसाठी तब्बल ३.५० लाख रुपये मोजले.या दोघांनी या कॉफीचं पेमेंट क्रेडिट कार्डने केलं. पैसे भरले तेव्हा त्यांना या बिलाच्या रकमेबद्दल कल्पना आली नाही.

मात्र जेव्हा ते पुढील शॉपिंगसाठी गेले तेव्हा कार्डवर बॅलेन्स ओव्हर लिमिट दाखवण्यात आला. त्यावेळी त्यांनी स्टेटमेंट चेक केलं असता त्यांना धक्काच बसला. ७०० ते ८०० रुपयांच्या कॉफीसाठी त्यांनी तब्बल ३ लाख ६७ हजार रुपये भरले. अमेरिकेतील हे जोडपं कायम कॉफी पिण्यासाठी स्टारबक्समध्ये जायचं. त्यांनी आपल्या आवडीच्या फ्लेवरची कॉफी मागवली. त्यांनी क्रेडिट कार्डने पेमेंट केलं आणि बिल न चेक करताच ते निघून गेले. हे दोघे शॉपिंग करण्यासाठी जेव्हा बाजारात गेले तेव्हा बिल भरताना कार्ड ओव्हर लिमिट दाखवण्यात आलं

# नजीकच्या भविष्यातलं संदेशवहन

आज संवादासाठी आपल्याला फक्त संगणकावरच अवलंबून राहावं लागत नाही. खरं तर सेलफोन आजचा फिरता संगणक बनला असून त्यामार्फत आपण अनेक गोष्टी स्वस्तात आणि सहज करू शकतो. तंत्रप्रणालींच्या संयोगामुळे विशेषत: चित्र, ध्वनी आणि माहितीच्या एकत्रित वापरामुळे एकात्मिक माहिती, संवाद आणि करमणुकीचं एक वेगळंच दालन उघडलं आहे. या तंत्रात २०२५ पर्यंत क्रांतिकारी बदल घडून येईल. गेल्या पाच-पंचवीस वर्षांमध्ये विज्ञान-तंत्रज्ञानाच्या प्रसारामुळे जगातली सर्व आथक-सामाजिक-राजकीय चित्रं, धोरणं आणि समीकरणे आरपार बदलली. यामध्ये इलेक्ट्रॉनिक्स आणि उपग्रहीय संवादमाध्यमांचा फार मोठा वाटा आहे आणि त्यामध्येही सूक्ष्मतंत्रज्ञान (नॅनो टेक्नॉलॉजी), सर्व संगणकीय वैशिष्ट्यं समाविष्ट असलेला सेलफोन आणि इंटरनेट यामुळे जगाच्या कानाकोप-यातल्या माणसांचंही जीवनचित्र पूर्णत: वेगळं झालं. काही तांत्रिक बाबी जाणणा-यांपर्यंत सीमित असणारं संगणक तंत्रज्ञान आता घरोघरी पोहोचलं आहे. आज संवादासाठी आपल्याला फक्त संगणकावरच अवलंबून राहावं लागत नाही. खरं तर सेलफोन आजचा फिरता संगणक बनला असून सेलफोनमार्फत आपण अनेक गोष्टी स्वस्तात, सहजपणे आणि आपल्या पसंतीच्या ठिकाणाहून करू शकतो. तंत्रप्रणालींच्या संयोगामुळे विशेषत: चित्र, ध्वनी आणि माहितीच्या एकत्रित वापरामुळे एकात्मिक माहिती, संवाद आणि करमणुकीचं एक वेगळंच दालन उघडलं आहे. जवळजवळ सर्व वाहिन्यांचे कार्यक्रम इंटरनेटच्या माध्यमातून संगणकावर टॅब व स्मार्टफोनवर पाहता येत असल्याने दूरचित्रवाणी संच (टीव्ही) हे उपकरण २०३० पर्यंत कालबाह्य होईल. ऑन डिमांड म्हणजे आपल्या गरजेनुसार ते बघता येणार असल्याने मनोरंजनाच्या कल्पना बदलत आहेत. सिनेमागृहंही २०४० पर्यंत याच कारणाने बंद पडतील.

घराबाहेर पडताना पूर्वी घरातली मंडळी आपल्याला विचारत असत, रुमाल-पाकीट व्यवस्थित आहे ना? आता त्यात अजून काही गोष्टींची भर पडली आहे. मोबाईल, संगणक आता त्याच यादीत सहभागी झाले आहेत. फार पूर्वीपासून रोटी-कपडा-मकान या माणसाच्या मूलभूत गरजा मानल्या गेल्या आहेत. बदलत्या काळानुसार यामध्ये थोडी भर घालून बिजली-बँडविड्थ ह्या दोन बाबींचाही समावेश केला गेला पाहिजे. वैयक्तिक संगणक आणि पीसी संस्कृतीच्या क्रांतीनंतर घरोघरच्या मातीच्या चुलींची जागा आता संगणकाने घेतली आहे. इंटरनेट ही चैनीची नसून अत्यावश्यक बाब बनत चालली आहे. नॉर्वेसारख्या विकसित देशात इंटरनेट हा मानवी हक्क म्हणून गणला जात आहे. हेच लोण २०२५ नंतर भारतातही येईल. जन्माला आलेल्या प्रत्येक व्यक्तीला अन्न, वस्त्र निवा-याबरोबरच वीज आणि इंटरनेट देणं सरकारवर बंधनकारक असेल. इंटरनेट हे हवेसारखं असेल. म्हणजे चकटफू आणि शक्तिशाली! बहुतेक सर्वांना इंटरनेट हा शब्द नक्कीच माहीत आहे मग ती व्यक्ती आधुनिक (पहिल्या) जगातली असो, भारतासारख्या विकसनशील देशांच्या (दुस-या) जगातली असो की अर्धविकसित किंवा अविकसित तिस-या जगातली. इंटरनेट ॲक्सेस ही सुविधा मिळणं आजघडीला सगळीकडे सहजशक्य नसलं तरी तिचा प्रसार वेगाने होत आहे हे नक्कीच. मात्र आजही या जगातल्या भरपूर म्हणजे तब्बल ३०० कोटी लोकांनी प्रत्यक्ष ऑनलाइन सर्फिंग (इंटरनेटची चक्कर म्हणजेच इंटरनेटवरील विविध साइट्स उघडून पाहणं, वाचणं, तिथल्या माहितीचा वापर करणं इत्यादी केलेलंच नाही. अगदी नियमितपणे इंटरनेटचा वापर करणा-यांपैकीदेखील २० टक्के नियमितपणे सर्फिंग करत नाहीत.

या परिस्थितीमुळे येत्या काही वर्षांमध्ये इंटरनेटच्या संभाव्य विकास आणि विस्ताराचं थेट चित्र उभं करणं जरा अवघड आहे. जागतिक लोकसंख्येपैकी कितीजणांना कधी, कसा, कोणाकडून, किती किमतीला तसंच किती सहजपणे आणि थेट ॲक्सेस मिळेल हे सांगणंही कठीण आहे. नवनिर्मितीच्या सर्जनशील प्रक्रियेमध्ये आणि व्यावसायिक, सामाजिक तसंच मानवी मूल्यांच्या निर्मितीमध्ये इंटरनेटचा सहभाग किती प्रमाणात राहील हे सध्या तरी थोडं अनिश्चित आहे. उद्योजक, वापरकर्ते, नियोजक इत्यादींमार्फत ह्या मुद्यांवर घेतले जाणारे निर्णय आणि ठरवली जाणारी धोरणं यावरच पुढल्या सहा वर्षांमधली इंटरनेटची उत्क्रांती अवलंबून राहील. २०१५ च्या आसपास होणारी इंटरनेटची वाढ आजच्या विकसित आणि श्रीमंत देशांमधील नागरिकांकडून नाही तर विकसनशील देशातल्या रहिवाशांद्वारे होईल. त्या वेळच्या इंटरनेटच्या विकासात आणि




वाढीत अध्यापेक्षा जास्त वाटा विकसनशील लोकसंख्येचा असेल आणि इंटरनेटचा जास्तीत जास्त वापर करण्याच्या त्यांच्या आंतरिक इच्छेचं प्रतिबिंब या वाढीच्या विविध पैलूंमध्ये स्पष्टपणे दिसून येईल. इंटरनेटचं नियंत्रण आणि नियमन कसं आणि कितपत करावं याबाबत मतभिन्नता असू शकते. पद्धत कोणतीही असो, इंटरनेटची एकंदर रचना सर्वसाधारणपणे कायम ठेवली जाईल. कोणत्याही कारणाने, विशेषत: समाजद्वेष्ट्या शक्तींद्वारे या सेवेत खंड पडू नये अथवा अडथळे येऊ नयेत यासाठी अधिकाधिक नियंत्रण ठेवण्याचीही मागणी कदाचित केली जाईल; परंतु याबाबतीत जागतिक पातळीवर स्पष्ट एकमत होणं अशक्य असल्याने २०२५ पर्यंत सध्या रूढ असलेली नियंत्रणपद्धतीच अमलात राहील, असं दिसतं.

आज प्रौढ वयात संगणक अथवा इंटरनेटशी संबंध आलेली पिढी आणि जन्मापासून संगणकीय युगातच वावरणारी म्हणजे साधारण १९९५ नंतर जन्मलेली मुलं-मुली यांच्या इंटरनेटकडे पाहण्याच्या दृष्टिकोनात मूलभूत फरक असणार आहेच. आजच्या मुलांना डिजिटल नागरिक म्हणतात. त्यांच्या संभाषणाच्या, गप्पा मारायच्या, संवादाच्या कल्पना पूर्णपणे वेगळ्या आहेत. अशा व्यक्ती इंटरनेटला आपल्या मानसिक किंवा बौद्धिक क्षमतांचं एक एकात्मिक, विस्तारित अंगच मानतात. आभासी (व्हच्र्युअल) अनुभवांच्या विश्वाचं तर इंटरनेट हे प्रवेशद्वारच आहे. आभासी अनुभव घेण्याच्या शक्यतेमुळे, काही काळाने मानवी मेंदूच्या काम करण्याच्या पद्धतीमध्येच विलक्षण फरक पडू शकेल. ही नवी पिढी इंटरनेट उशाशी घेऊनच असेल. इंटरनेटला आसपासच्या वातावरणातून वेगळं काढूच न शकण्याच्या आणि विचार करण्याइतक्या किंवा बोलण्याइतक्याच सहजपणे त्यांच्याकडून इंटरनेटचा वापर केला जाईल. इंटरनेट हे त्यांच्या भावविश्वाचंच एक अंग आहे. अतिरेकामुळे काही इंटरनेट व्यसनीही बनतात. आज हा इंग्रजी कळफलक (कीबोर्ड) सगळीकडे वापरला जातो; परंतु कालांतराने इंटरनेटवर लिहिण्यासाठी तेवढा एकच मार्ग राहणार नाही तर वापरकर्त्यांचा आवाज (व्हॉइस रेकग्निशन), हालचाली आणि हावभाव (जेश्चरल इंटरफेस) किंवा इतर शारीरिक वैशिष्ट्यं (बायो-सेन्सिंग) तसंच स्पर्शपद्धती (टच-स्क्रीन) अशांसारख्या आणि इतरही नवनवीन त-हांनी कळफलक नवापरता माहिती आणि आज्ञा संगणक अथवा इंटरनेटपर्यंत पोहोचवता येतील आणि यामुळे इंटरनेट वापरणा-यांच्या संख्येत विलक्षण वेगाने वाढ होईल.

# यंदाच्या वर्षातही बिर्याणीच भारतीयांची सर्वात आवडती



भारतीयांच्या सर्वात आवडत्या पदार्थांत यंदाही बिर्याणी अव्वल ठरली आहे, तर स्नॅसमध्ये सामोशाने पहिला, तर त्या पाठोपाठ गुलाबजामने नंबर मिळविला. ऑनलाइन फूड डिलिव्हरीच्या क्षेत्रातील स्विगी या ॲपच्या एका अहवालातून ही माहिती मिळाली.

या अहवालानुसार, यंदाच्या (२०२२) या वर्षात बिर्याणीच्या ऑर्डर्स सर्वाधिक होत्या. सलग सातव्यांदा बिर्याणी अव्वल ठरली आहे. दर सेकंदाला २.२८ ऑर्डर्सचा नवा विक्रमही बिर्याणीने नोंदविला असून, या वर्षी दर मिनिटाला या पदार्थाच्या १३७ ऑर्डर्स स्विगीने पूर्ण केल्या आहेत. या ॲपवरून मोठ्या प्रमाणात ऑर्डर केलेल्या अन्य पदार्थांमध्ये चिकन फ्राइड राइस, व्हेज फ्राइड राइस, मसाला डोसा, तंदुरी चिकन, पनीर बटर मसाला, बटर नान, चिकन बिर्याणी आणि व्हेज बिर्याणी या पदार्थांचा समावेश आहे.

परदेशी खाद्यपदार्थही भारतीयांना पसंत पडत असल्याचे या अहवालात म्हटले आहे. मिसकन बाउल, सुशी, इटालियन पास्ता, स्पायसी रामेन आणि पिझ्झालाही चांगली मागणी आहे. स्नॅसमध्ये ४० लाख ऑर्डर्ससह सामोसा अव्वल क्रमांकावर आहे.

स्विगीवर ऑर्डर केलेल्या अन्य पदार्थांत पॉपकॉर्न, पावभाजी, फ्रेंच फ्राइज, गार्लिक ब्रेडस्टिस, हॉट विंग्ज, टॅको, लासिक स्टफ्ड गार्लिक ब्रेड आणि मिंग्लेस बकेट यांचा समावेश आहे.

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# कारखान्यातील भीषण स्फोटाने १० गावांमध्ये हादरा: एकाचा जागीच मृत्यू, तर चार जण गंभीर जखमी, नागपुरात खळबळ...

**नागपूर :** नागपूर जिल्ह्यातील बाजारगाव येथे गुरुवारी पुन्हा एकदा कारखान्यात मोठा स्फोट झाल्याची घटना घडली आहे. सोलर एक्सप्लोसिव्ह लिमिटेडच्या -१५ प्लांटमध्ये घडलेल्या या दुर्घटनेत एका कर्मचाऱ्याचा मृत्यू झाला असून चार जण गंभीर जखमी आहेत. जखमींवर सध्या आयसीयूमध्ये उपचार सुरू आहेत. सदर दुर्घटनेत आणखी नऊ जणांना किरकोळ दुखापती झाल्या आहेत. मध्यरात्री झालेल्या या स्फोटाचा आवाज एवढा मोठा होता की, स्फोटानंतर महामार्गावर मलबा उडाला. स्फोटाचा आवाज एवढा प्रचंड होता की त्याचे हादरे बाजारगावसह शिवा, सावंगा आणि आसपासच्या दहा गावांत जाणवले. घाबरलेल्या नागरिकांनी मध्यरात्री घराबाहेर धाव घेतली. स्फोटानंतर कारखान्यातील लाखो रुपयांची यंत्रसामग्री व साहित्य जळून खाक झाले. नागपूर-अमरावती महामार्गालगत असलेल्या या युनिटमध्ये ग्रेनेड, ड्रोन्स आणि विविध स्फोटके तयार केली जातात. त्यातीलच -१५ प्लांटमध्ये रात्री १२:३४ वाजता ही दुर्घटना घडली. सोलर एक्सप्लोसिव्हमध्ये मध्यरात्री झालेल्या अपघातात आरएनडी लॅबमधील मयूर गणवीर नावाच्या कामगाराचा मृत्यू झाला. कारखान्यात , आणि सारखी स्फोटके तयार केली जातात. काम सुरू असताना धूर निघत असल्याचे दिसल्यावर बहुतेकांना बाहेर काढण्यात आले आणि त्यामुळे आणखी मोठी दुर्घटना टळली. मात्र मयूर यांचा जीव वाचवता आला नाही. घटनास्थळी मलब्याचे ढीग आणि दूरवर फेकलेले साहित्य पाहून स्फोट किती भीषण होता याची कल्पना येते.दरम्यान, या अपघातामुळे कामगारांच्या सुरक्षिततेबाबत गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत. विदर्भातील नागपूर, भंडारा, चंद्रपूर या जिल्ह्यांत सरकारी तसेच खासगी स्फोटक निर्मिती कारखाने आहेत. लष्करी



वापरासाठी बॉम्ब, अग्निबाण, कवच आणि इतर स्फोटके येथे तयार होतात. मात्र सतत होणाऱ्या स्फोटांमुळे या कारखान्यांतील कामगारांचे जीव धोक्यात आले आहेत. या नव्या दुर्घटनेने नागपूर जिल्ह्यातील नागरिक आणि कामगार वर्गात तीव्र अस्वस्थता पसरली आहे.

# अरे बाळा कुठे आहेस? ३ वर्षांचा ईश्वर घराबाहेर दिसेना, पाण्याच्या खड्ड्यात बॉडी पाहताच आईने...

**छत्रपती संभाजीनगर :** शहराला पाणीपुरवठा करण्यासाठी जलवाहिनी टाकण्यासाठी खोदलेल्या १५ फूट खड्ड्यात पडून ३ वर्षाच्या चिमुकल्याचा मृत्यू झाला. ही दुर्दैवी घटना देवळी परिसरातील माढा कॉलनी येथे बुधवारी घडली. या घटनेमुळे चिमुकल्याच्या आई-वडिलांनी टाहो फोडला तर परिसरातील नागरिकांनी हळहळ व्यक्त केली.ईश्वर संदीप भास्कर (वय ३) राहणार देवळे परिसर असे खड्ड्यात बुडून मृत्यू झालेल्या चिमुकल्याच नाव आहे. याप्रकरणी अधिक माहिती अशी, मृत ईश्वरच कुटुंब हे मूळचे उत्तर प्रदेश येथील आहे. मृत ईश्वर चे वडील संदीप हे १२ वर्षांपूर्वी पोट भरण्यासाठी छत्रपती संभाजीनगर शहरात आले. त्यांना एकूण ३ मुल होती त्यातील ईश्वर हा सर्वात लहान मुलगा होता.बुधवारी दुपारच्या सुमारास ईश्वर हा खेळण्यासाठी घराबाहेर पडला. घराबाहेर नेहमीच्या मुलांसोबत खेळत होता. बराच वेळ झाला तो घरी आला नाही. यामुळे



त्याची आई रेखा यांनी ईश्वरचा शोध घ्यायला सुरुवात केली. ईश्वर हा मुलांसोबत खड्ड्याकडे खेळण्यासाठी केल्याचं आईला कळालं. यामुळे रेखा या खड्ड्यापर्यंत गेल्या. यावेळी त्यांना ईश्वरचा मृतदेह खड्ड्यातील पाण्यात तरंगताना दिसला. मृतदेह बघताच आईच्या पायाखालची जमीन सरकली. रेखा यांनी घटनास्थळी टाहो फोडत खड्ड्यात उडी मारली. स्थानिकांनी रेखा यांना वाचवले. तर खड्ड्यात पडून असलेल्या ईश्वरला बाहेर काढतात काय रुग्णालयात दाखल केली. डॉक्टरांनी तपासून मृत घोषित केले.दरम्यान, या घटनेमुळे ईश्वरच्या आई-वडिलांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. पाण्याच्या पाईपलाईन साठी खड्डे खोदून ठेवल्याने हा मृत्यू झाला याला? जबाबदार कोण? प्रशासन दोषींवर कारवाई करेल का? असा सवाल नागरिकांमधून केला जात आहे. मात्र या खड्ड्याने चिमुकल्या ईश्वरचा बळी घेतला, त्याल जगाचा निरोप घ्यावा लागला.

# बाप्पाच्या दर्शनाला निघाले, पण वाटेत अनर्थ बापलेकाची कायमची ताटातूट, आई जखमी, काय घडलं?

**भंडारा:** गणपती दर्शनासाठी भंडाऱ्यात आलेल्या दाम्पत्याच्या दुचाकीला ट्रकने धडक दिली. या भीषण अपघातात पतीचा मृत्यू तर पत्नी आणि मुलगा जखमी झाले. ही घटना मंगळवारी रात्री १० वाजताच्या सुमारास भंडारा शहरातील साई मंदिरसमोर घडली.जगदीश गजानन चकोले (३६) रा. मोहाडी (मौदा, जि.नागपूर) असे मृताचे नाव आहे. जगदीश हे मौदा येथील एका कंपनीत चालक म्हणून कामाला होते. मंगळवारी सुटी असल्याने पत्नी आणि दोन्ही मुलांसह भंडारा येथे गणपती दर्शनासाठी संध्याकाळी ५ वाजता गावावरून निघाले होते. त्यांच्यासोबत गावातील योगेश माकडे हा मित्रसुद्धा त्याच्या कुटुंबासह दुसऱ्या दुचाकीने आला होता.मंगळवारी रात्री साई मंदिर मार्गावरून राजीव गांधी चौकाकडे जात असताना ट्रक (सीजी ०७ बीपी ९६७७)च्या चालकाने भरधाव वेगात वाहन चालवून जगदीश यांच्या दुचाकीला मागेहून धडक दिली. या अपघातात जगदीश यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली तर पत्नी आणि मुलगा जखमी झाला. अपघातानंतर घटनास्थळी नागरिकांची गर्दी झाली. नागरिकांनी ट्रकचालकाला चांगलाच चोप दिला. तातडीने रुग्णवाहिकेने जगदीश यांच्यासह पत्नी आणि मुलाला जिल्हा रुग्णालयात हलविण्यात आले. परंतु, रुग्णालयात पोहचण्यापूर्वीच जगदीश यांचा मृत्यू झाला होता.भंडारा पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत परिस्थिती नियंत्रणात आणली. आरोपी ट्रकचालकाविरोधात पोलिसांनी विविध कलमान्वये गुन्हा नोंदविला आहे.



# डाक अदालत १० सप्टेंबरला होणार...

जनसंचलन/बुलढाणा

पोस्ट विभागाच्या तक्रारी सोडविण्यासाठी बुलडाणा डाकघर विभागातर्फे बुधवार, दि. १० सप्टेंबर २०२५ रोजी सकाळी ११ वाजता डाक अदालत आयोजित करण्यात आले आहे. पोस्टाच्या कार्याविषयी किंवा कामकाजाबद्दल सहा आठवड्यात तक्रारींचे निवारण झालेले नसल्यास अशा तक्रारींची दखल डाक अदालतीमध्ये घेतल्या जाणार आहे. देशातील पोस्टाची सेवा ही सामाजिक आणि आर्थिक जीवनाचा एक अभिन्न भाग आहे. देशातील प्रत्येक नागरिकांच्या मनामध्ये पोस्टाच्या सेवेने वेगळ्या प्रकारचे स्थान निर्माण केले आहे. पोस्ट खाते हे लोकांना चांगल्या प्रकारची सेवा देण्याचा व ग्राहकांचे जास्तीत जास्त समाधान करण्याचा प्रयत्न करते. ही सेवा देताना संभाषण, पत्रव्यवहार किंवा सेवेमध्यील काही त्रूटीमुळे पोस्टाच्या सेवेबद्दल तक्रारी होतात. तक्रारींचा योग्य प्रकारे न्याय निवडा करण्यासाठी पोस्ट खात्यातर्फे डाक अदालती घेण्यात येते. विशेषत: टपाल, स्पीड पोस्ट, डाक वस्तू पार्सल, बचत बँक आणि मनीऑर्डरबाबत तक्रारी विचारात घेतल्या जातील. तक्रारींचा उल्लेख सर्व तपशीलासह केलेला असावा. तक्रारीत तारीख आणि ज्या अधिकाऱ्यास मुळ तक्रार पाठविली त्याचे नाव आणि हुद्दा आदी संबधित माहिती डाक सेवेबाबत तक्रार डाकघर अधिक्षक गणेश आंभोरे, बुलडाणा विभाग, यांचे नावे दोन प्रतीत सोमवार, दि. ८ सप्टेंबर २०२५ पर्यंत पोहचेल, अशा रीतीने पाठविण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# विश्वनाथ माळी यांची बुलडाणा नगर पालिका निवडणूक प्रभारी नियुक्ती

जनसंचलन/बुलढाणा

भाजपचे महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष विश्वनाथ माळी यांची बुलढाणा नगर पालिका निवडणूक प्रभारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

बुलढाणा जिल्हा भाजपा अध्यक्ष विजयराजजी शिंदे यांनी श्री विश्वनाथ माळी साहेब, उपाध्यक्ष महाराष्ट्र प्रदेश भाजपा मोर्चा यांची बुलडाणा नगर पालिका निवडणूक प्रभारी म्हणून घोषणा केली त्या बद्दल त्यांचे अभिनंदन व सत्कार करतांना भाजप नेते



गणेशसिंग जाधव बुलडाणा व जगन्नाथ गोरे,राजेश पाटील, विलास तायडे, प्रथमेश औतकर, गणेश पाटील.

# आदिवासी भागातील सुविधांची पूर्तता न झाल्यास शिवसेनेचा अर्ध नग्न आंदोलनाचा इशारा...

जनसंचलन/ जळगाव जामोद

गेल्या काही दिवसा अगोदर आर सी २४ न्यूज ने राजुरा बुद्रूक येथील रस्त्याच्या समस्यांसह गावकऱ्यांच्या विविध समस्यांबाबत बातमी प्रकाशित करण्यात आली होती त्या बातमीची दखल घेत शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने दिनांक ३ सप्टेंबर रोजी जळगाव जामोद पंचायत समितीचे प्रभारी गट विकास अधिकारी यांना निवेदन देऊन सातपुड्याच्या पायथ्याशी वसलेल्या राजुरा बुद्रूक येथील आदिवासी गावांमध्ये नागरी वस्तीत रस्ते नाल्या गटारी तसेच येथे जिल्हा परिषदेची पहिली ते पाचवीपर्यंत शाळा असून त्या ठिकाणी सुद्धा मुलांना पिण्याच्या पाण्याची व्यवस्था नसल्यामुळे मुलांना हातपंपाचे दूषित पाणी प्यावे लागते तसेच येथील नागरिकही हेच पाणी पितात तसेच रस्त्याची अवस्था अत्यंत दयनीय असल्यामुळे विद्यार्थ्यांना व नागरिकांना जाण्या येण्याचा त्रास सहन करावा लागत आहे तर दुसरीकडे रसलपूर ग्रामपंचायत च्या अंतर्गत गोरगरीब लोकांना शासनाकडून घरकुल मिळालेले असून या गोरगरीब आदिवासींना पंचायत समिती मार्फत सोडलेले दलाल आर्थिक फटका देत आहेत. राजुरा बुद्रुक येथील शाळेमध्ये वॉटर प्युरिफायर बसून, रस्त्याची कामे लवकरात लवकर सुरू करा तसेच गावकऱ्यांच्या समस्या मार्गी लावा या मागणीचे निवेदन उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्यावतीने देण्यात आले. निवेदनावरील मागण्या ३ ऑक्टोबर पर्यंत पूर्ण न झाल्यास चार ऑक्टोबर रोजी शिवसैनिक पंचायत समिती समोर अर्धा नग्न आंदोलन करतील असा इशारा या निवेदनाद्वारे देण्यात आला आहे. निवेदन देतेवेळी शिवसेनेचे जिल्हाध्यक्ष गजानन वाघ, शिवसेना सह संपर्कप्रमुख दत्ता पाटील, उपजिल्हाप्रमुख तुकाराम काळपांडे, अल्पसंख्यांक जिल्हाप्रमुख मुश्ताक भाईजान, जळगाव जामोद तालुका प्रमुख संतोष दांडगे, युवा सेना जिल्हाप्रमुख शुभम पाटील, शहर प्रमुख रमेश ताडे, उप शहरप्रमुख शेख चांद कुरेशी,सुभाष माने, विशाल पाटील, मोहम्मद फारूक, अबिद तडवी, आसिफ तडवी, गुलशेर तडवी, तुळशीराम कुमारीया यांच्यासह रसूलपुर ग्रामपंचायत हद्दीतील आदिवासी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# महिला बचत गट ठेव संचय संकल्पनेतून राजलक्ष्मी अर्बनची निर्मिती ...!

जनसंचलन/बुलढाणा

महिला बचत गट ठेव संचय संकल्पनेतून निर्माण झालेल्या राजलक्ष्मी अर्बन को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटीचा उद्घाटन सोहळा ५ सप्टेंबरला केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव यांच्या हस्ते होणार आहे ... भारतात स्वयंरोजगार महिला संघटनाच्या माध्यमातून १९७० च्या दशकात बचत गट कार्य सुरू झाले बचत गटाच्या माध्यमातून महिलांचे आर्थिक स्वावलंबन निर्माण करून त्यांच्या जीवनात सुधारणा घडवून आणण्यासाठी बचत गटाची निर्मिती करण्यात आली आहे बुलढाण्यात एम्पायर महिला बचत गटातील महिलांनी जमा झालेल्या ठेव संचय संकल्पनेतून राजलक्ष्मी अर्बन महिला को-ऑपरेटिव्ह सोसायटीची स्थापना करण्यात आली आहे या महिला सहकारी पतसंस्थेचा उद्घाटन सोहळा ५ सप्टेंबरला केंद्रीय आयुष (स्वतंत्र प्रभार ) आरोग्य कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांच्या हस्ते होणार आहे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ,बुलढाणा विधानसभा मतदारसंघाचे आमदार संजय गायकवाड ,बुलढाणा अर्बनेचे अध्यक्ष राधेश्याम चांडक हे प्रमुख मार्गदर्शक तर

राजलक्ष्मी

काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ आमदार धीरज लिंगाडे माजी मंत्री राजेंद्र शिंगणे भाजपाचे जिल्हाध्यक्ष माजी आमदार विजयराज शिंदे माजी आमदार घृपतराव सावळे शेतकरी नेते रविकांत तुपकर उबाठा शिवसेनेच्या प्रवक्त्या जयश्री शेळके जिल्हाप्रमुख जालिंदर बुधवत तलाठी पटवारी मंडळ अधिकारी समन्वयक महासंघाचे अध्यक्ष विजय टेकाळे जिल्हा उपनिबंधक डॉ महेंद्र चव्हाण तालुका निबंधक गजानन आमले उपस्थित राहणार आहेत बचत गटाच्या ठेव संचयातून निर्मित झालेल्या या महिला पतसंस्थेच्या कार्यक्रमाला महिलांनी आणि नागरिकांनीही उपस्थित रहावे असे आवाहन राजलक्ष्मी महिला अर्बन परिवाराच्या वतीने करण्यात आले.

# अतिवृष्टीने कष्टाचे मातेरे! १९ दिवसात ८९७३० हेक्टर क्षेत्रावर निसर्गाची टाच!

जनसंचलन/बुलढाणा

कबाडकष्ट करून जगवलेले पीक शेतजमीनीसह अतिवृष्टीने हिरावून नेल्याने शेतात तळे तर शेतकऱ्यांच्या डोळ्यात देखील पाणी साचल्याचे दुःखद चित्र आहे. गेल्या ऑगस्ट महिन्यातील १९ दिवसात तब्बल ४५६ गावे अतिवृष्टीने बाधीत होऊन नैसर्गिक आपत्तीने ८९७३०.७० फक्त शुक्रवार पाणी फेरले आहे.परंतु त्यानंतरचे पंचनामे गाळात रुतले असून, नुकसान भरपाईची मागणी उठत आहे. आसमानी व सुलतानी संकटांना सामोरे जाणारा शेतकरी यंदाच्या खरीप हंगामात अतिवृष्टीमुळे हताश झाल्याचे दिसून येत आहे. कधी दुष्काळ, कधी अतिवृष्टी, कधी पीकविम्याची प्रतिक्षा, कधी बाजारभावाची अनिश्चितता अशा हे संकटांच्या साखळीत अडकलेले शेतकरी शेवटी गळ्या भोवती फास लावून आयुष्यच संपवत असल्याचे जळजळीत वास्तव आहे. गेल्या ६ महिन्यात जिल्ह्यातील ९१ शेतकऱ्यांनी मृत्यूला कवटाळले आहे.



दुष्काळग्रस्त जिल्हा म्हणून बुलढाणा ओळखला जातो. नापिकी, कर्जाचा डोंगर, वांझोटी पिक विमा योजना,हवामानातील बदल, शेत मालाला भाव नसणे इत्यादी अनेक कारणास्तव आणि सरकारचे शेतकऱ्यांप्रति उदासीन धोरण या कारणामुळे शेतकरी आत्महत्येत वाढ होत आहे. शेतकरी सातबारा कोरा होण्याची वाट पाहत असून,सत्ताधारी आश्वासन देत वेळ मारून नेतांना दिसतात.मात्र कर्जमाफी च्या काही हालचाली दिसून येत नाही. परिणामी शेतकरी आत्महत्येत वाढ होत आहे.दरम्यान एक ते १९ ऑगस्ट पर्यंत अतिवृष्टीमुळेबुलढाणा जिल्ह्यातील ६ तालुक्यातील ४५६ गावे बाधित झाली असून, ८९७३०.७० हेक्टरवरील सोयाबीन, तूर,मका,हळद, कापूस, उस, भाजीपाला आणि फळबाग उध्वस्त झाली आहे. त्यापैकी अति पावसामुळे १०२ हेक्टर जमीन खरडून गेली आहे.दरम्यान १९ ऑगस्ट नंतरचे पंचनामे झाले नसून पीक नुकसानीचा आकडा आणखी फुगणार असल्याची शक्यता नाकारता येत नाही. बुलढाणा जिल्ह्यातील १३ तालुक्यापैकी अतिवृष्टीमुळे चिखली येथील १८१,मेहकर येथील १६१, देऊळगाव राजा येथील ६४, संग्रामपूर येथील २४, सिंदखेडराजा येथील २२ तर मोताळा येथील ४ अशी ४५६ गावेबाधितझालीआहे.

# आयुर्वेदाला बळकटी देण्यासाठी राज्यनिहाय आराखडे व मानक कार्यपद्धती तयार करणार- आयुषमंत्री प्रतापराव जाधव ....

जनसंचलन/बुलढाणा

आयुर्वेदाला अधिक बळकट करण्यासाठी राज्यनिहाय आराखडे व मानक कार्यपद्धती तयार करणे गरजेचे असल्याचे मत केंद्रीय आयुष ( स्वतंत्र प्रभार ) आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी व्यक्त केलाय नवी दिल्ली येथील सरिता विहार येथे अखिल भारतीय आयुर्वेद संस्थेत आयोजित ङ्कराष्ट्रीय आयुष अभियान आणि राज्यांतील क्षमता विकासफ या विभागीय परिषदेचे उद्घाटन आज ३ सप्टेंबरला झाले त्यावेळी अध्यक्ष भाषणात आपलं मनोगत व्यक्त करताना केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव बोलत होते या दोन दिवसीय शिबिराच्या उद्घाटन कार्यक्रमाला निती आयोगाचे सदस्य डॉ. विनोद कुमार पॉल आणि आयुष मंत्रालयाचे सचिव वैद्य राजेश कोटेचा उपस्थितीत होते केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव पुढे म्हणाले की राज्यनिहाय गरजांनुसार सशक्त आणि सर्वसमावेशक आरोग्य आराखडा उभारण्याच्या सरकारच्या बांधिलकीवर भर दिला आहे देशभरातील आरोग्यसेवा अधिक प्रभावी करण्यासाठी सर्वसमावेशक मानक कार्यपद्धती विकसित करण्याच्या सरकार प्रयत्न करत आहे . आमचे उद्दिष्ट म्हणजे राज्यनिहाय आराखडे तयार करणे, सर्वसमावेशक विकसित करणे, उत्तम आरोग्य पायाभूत सुविधा उभारणे, लोकांना दर्जेदार सेवा उपलब्ध करून देणे आणि आयुष पद्धतीचे आधुनिक आरोग्य व्यवस्थेशी एकात्मिकरण सुनिश्चित करणे आहे.फ्र पंतप्रधानांच्या दूरदर्शी नेतृत्वाखाली २०१४ मध्ये सुरू झालेल्या राष्ट्रीय आयुष अभियानाच्या प्रगतीचा आढावा घेताना, प्रतापराव जाधव यांनी या अभियानाने परवडणाऱ्या आणि सर्वसमावेशक आयुष आरोग्यसेवेत मोठी प्रगती साधल्याचे नमूद केले. त्यांनी विशेषतः देशभरात उभारण्यात येणाऱ्या १२,५०० आयुष्मान आरोग्य मंदिरांच्या परिवर्तनकारी उपक्रमावर भर दिला. यामुळे ओपीडी-आधारित सेवांपासून सर्वसमावेशक सेवा वितरण



मॉडेलकडे झालेला मूलभूत बदल अधोरेखित झाला असून प्रतिबंधात्मक व प्रोत्साहनात्मक आरोग्यसेवेवर यामध्ये विशेष लक्ष केंद्रीत करण्यात आले आहे. ते पुढे म्हणाले की, ४ मार्च २०२४ रोजी आयुष मंत्रालयाने आयुष आरोग्यसेवा संस्थांसाठी ङ्कइंडियन पब्लिक हेल्थ स्टँडर्ड्सफ () सुरू केले. हे मानदंड निती आयोग आणि आरोग्य सेवा महानिदेशालय () यांच्या सल्लामसलतून विकसित करण्यात आले असून, आयुष क्षेत्रातील पायाभूत सुविधा, मानव संसाधन, क्षमता विकास, औषधे, गुणवत्ता हमी, नैदानिक चाचण्या आणि ब्रँडिंग या सर्व बाबींमध्ये एकसमानता व दर्जा सुनिश्चित करण्याच्या दिशेने हे एक महत्त्वाचे पाऊल आहे.

# वृत्तेश्वर गणेशोत्सव मंडळाची प्रशंसनीय आरोग्य सेवाथॉयराईड शिबीरात झाली ११२ जणांची तपासणी

जनसंचलन/बुलढाणा

गणेशोत्सव केवळ धार्मिक न राहता त्याला सामाजिक उपक्रमांची जोड देवून लोकोत्सव करण्याच्या अनुषंगाने वृत्तेश्वर गणेशोत्सव मंडळ समाजोपयोगी उपक्रम राबवित आहे. जिल्हा पत्रकार भवन परिसरात बुलढाणा जिल्हा पत्रकार संघाच्या वृत्तेश्वर गणेशोत्सव मंडळाकडून अकोला येथील थायोकेअर लॅब यांच्या सौजन्याने बुधवार, ३ सप्टेंबर रोजी थायरॉईड तपासणी शिबीर झाले. या शिबीरात एकुण ११२ जणांची तपासणी झाली. सुस्ती, थकवा, बद्धकोष्ठता, अनियमित मासिक पाळी, वंध्यत्व, हातपाय सुजणे, वजन वाढणे, घाम येणे, अशक्तपणा, चिंता, निद्रानाश, हात थरथरणे असे काही हायपरथायरॉईड आणि हायपोथयरॉईडीझमची लक्षण आहेत. आपण थायरॉईडने ग्रस्त असल्याबाबत अनेकांना उमगत नाही. थायरॉईडची तपासणी करून याबाबतचे निदान झाले तर उपचार सोपे होतात, या अनुषंगाने वृत्तेश्वर गणेशोत्सव मंडळाचे अध्यक्ष रणजीतसिंग राजपूत यांच्या संकल्पनेतून थायरॉईड तपासणी शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. शिबीराला बुलढाणेकरांचा उदंड



प्रतिसाद मिळाला. थायोकेअर लॅबचे तंत्रज्ञ सोनू पाटील यांनी सदरची तपासणी केली. त्यांना जिल्हा पत्रकार संघ आरोग्य सेलचे उपाध्यक्ष डॉ. भागवत वसे तसेच उपसंपादक अजय काकडे, एएसपीएम आयुर्वेद महाविद्यालयाचे पोहीत शिवरकर यांचे सहकार्य लाभले. शिबीराच्या उद्घाटनप्रसंगी निमा संघटनेचे राष्ट्रीय उपाध्यक्ष डॉ. गजानन पडघान, स्फूर्ती क्लस्टर उद्योग समूहप्रमुख सुनिल भालेराव, होमिओपॅथी असो. चे अध्यक्ष डॉ. दुर्गासिंग जाधव, डेंटीस्ट असोसिएशनचे डॉ. राजेश जतकर, सहयोग हॉस्पीटलचे डॉ. सचिन झगडे, माजी होमगार्ड समादेशक जगदेवराव बाहेकर आदि मान्यवर उपस्थित होते. बुलढाणा जिल्हा पत्रकार संघाचे अध्यक्ष रणजीतसिंग राजपूत यांनी प्रस्तावना मांडतांना वृत्तेश्वर गणेशोत्सव मंडळाकडून राबविण्यात येणाऱ्या सामाजिक उपक्रमांची माहिती दिली.

# भोसा येथील वैद्यकीय प्रवेश पात्र ठरलेल्या आदिवासी मुलींचा सत्कार.

## नंदिनी टारपे महिला प्रदेशाध्यक्ष अखिल भारतीय आदिवासी विकास परिषद यांनी केले कौतुक

जनसंचलन/बुलडाणा

बुलडाणा जिल्हातील अतिशय दुर्गम भाग म्हणून ओळखल्या जाणाऱ्या भोसा ता. मेहकर येथील आदिवासी समाजातील अशोक रामभाऊ बेले या मजूर वर्गातील व्यक्तीच्या दोन मुली कु. आरती अशोक बेले व कु. राधा अशोक बेले यांनी आदिवासी ग्रामीण भागात शिक्षण घेऊन नीट परीक्षेत पात्र झाल्या त्यामुळे गव्हर्मेंट मेडिकल कॉलेजमध्ये प्रवेशमध्ये मिळाला असल्यामुळे गावाचे नाव उज्वल केले आहे. घरची बिकट परिस्थिती असूनही आपल्या दोन मुलींना शिक्षणासाठी प्रोत्साहन दिल्यामुळे बेले कुटुंब आज समाजासाठी प्रेरणादायी ठरले आहे. या यशाबद्दल भारतीय अखिल आदिवासी समाजाच्या प्रदेश अध्यक्षा नंदिनीताई टारपे, व माजी जि. प. जिल्हाध्यक्ष भास्करराव ठाकरे यांनी विशेष उपस्थित राहून कु. आरती बेले व कु. राधा बेले यांचा शाल व पुष्प गुच्छ देऊन सत्कार केला, यावेळी मुलींच्या आई वडील व आजीआजोबा यांचा सुद्धा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे आयोजन ग्रामसेवक माधवराव देवकर यांनी केले होते. जिल्हा परिषद शिक्षक डाखोरे सर यांनी उत्तम सूत्रसंचालन केले. या प्रसंगी सौ. नंदिनी टारपे यांनी आपल्या भाषाणूतन त्यांच्या रोज मजुरी करून खाणारे आई वडिलांचे कौतुक केले तसेच हार्दिक हा प्रवेश केवळ कुटुंबात नाही तर संपूर्ण गावाचा अभिमान क्षण आहे कष्ट जिद्द आणि शिक्षणाला श्रद्धा यामुळे कोणतीही स्वप्न पूर्ण होऊ शकतात याची प्रेरणादायी उदाहरण या दोन मुलींमुळे आदिवासी समाजातील नवीन युवा पिढीला चालना देणार आहे. तसेच मुलींना त्यांच्या पुढील वाटचालीस



शुभेच्छा दिल्या व यावेळी ठाकरे साहेब समाजा प्रबोधन केले.व सुभाष वाघमारे साहेब यांनी डॉ. बाबासाहेब याचे उदाहरण देऊन नवीन पिढीला शिक्षणाचे महत्व पटून दिले. यावेळी आदिवासी कर्मचारी संघटनेचे जिल्हा सचिव वैजेनाथ फोपसे साहेब,सुरेशभाऊ लोखंडे, बबन जामकर, खिल्लारे साहेब, सरपंच जमुना, समाधान भोकरे, सुनील डाखोरे, राजूभाऊ भोंडने (माजी उपसरपंच) आदी मान्यवर उपस्थित होते. विशेष म्हणजे लहान मुलाचे महिलांचा सुद्धा खूप सहभाग होता.सर्व मान्यवरांनी दोन्ही विद्यार्थिनींना व गावातील इतर विद्यार्थ्यांना मौल्यवान मार्गदर्शन केले.

# रात्री अवैध वाळूच्या ट्रकसह १५२०,००० रुपयांचा मुद्देमाल जप्त!

जनसंचलन/बुलढाणा

शहरात अवैध वाळू वाहतूक सुरू असून, ३ सप्टेंबर रोजी शहरातील एचडीएफसी चौकात गस्तीवर असलेल्या एलसीबी पोलिसांनी २ ब्रास अवैध वाळू सह एक ट्रक असा एकूण १५२०,००० रुपयांच्या मुद्देमालाच्या जप्तीची कारवाई करण्यात आली आहे.आकाश रमेश सोखंडे,मयूर रमेश उज्जैनकर दोघे रा. मलकापूर असे आरोपींची नावे आहे. महसूल यंत्रणा व पोलीस विभाग कितीही दक्ष असला तरी, शहरात रात्री बे रात्री अवैध वाळू वाहतूक धडाक्यात सुरु आहे. वाळू माफिया कुणाला जुमानत नसल्याचे चित्र आहे. स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सुनील अंबुलकर यांनी अवैध व्यवसायावर कारवाई करण्याचे आदेश दिल्याने शहरातील एचडीएफसी चौकात ३ सप्टेंबर रोजी गस्त घालत असताना,एक वाजून ३५ मिनिटांनी नाकाबंदी केली असता, एका एमएच २८ बीबी ४९७४



क्रमांकाच्या लेलँड ट्रक मध्ये अंदाजीत २०,००० रुपयांची दोन ब्रास वाळू आढळून आली.चालकाकडे परवाना नव्हता. त्यामुळे चालक आणि ट्रक मालका विरुद्ध ३०२(२)बीएनएस सहकलम २१(१)२१(२) दोन खनिज अधिनियम नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.ही कारवाई जिल्हा पोलीस अधीक्षक निलेश तांबे,अपर पोलीस अधीक्षक अमोल गायकवाड, श्रेणिक लोढा यांच्या मार्गदर्शनात करण्यात आली. सदर कारवाई एएसआय ओमप्रकाश सावळे, एएसआय राजकुमार राजपूत,एचसी दिगंबर कपाटे, गजानन दराडे, जगदेव टेकाळे, पीसी दीपक वायाळ, गडकर, चालक राहुल बोर्डे या पथकाने केली.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ ९८२२७२०७८४ ऑफिस :- ९१२९५८२९५८